## MAHARASHTRA ACT No. VII OF 1985

## THE INDIAN FOREST (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1984

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २९ एप्रिल, १९८५ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एच. के. कुलकर्णी,
सह सचिव, विधि व न्याय विभाग,
महाराष्ट्र शासन

## MAHARASHTRA ACT No. VII OF 1985

## AN ACT FURTHER TO AMEND THE INDIAN FOREST ACT, 1927 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ३ मे, १९८५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७

### भारतीय वन अधिनियम, १९२७ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम

१९२७ चा १६. **ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, भारतीय वन अधिनियम, १९२७ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या पस्तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.** १. (१) या अधिनियमास, भारतीय वन (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८४ असे म्हणता येईल.

(२) तो, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा तारखेस अंमलात येईल.

**सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २ ची सुधारणा.** १९२७ चा १६. १८७९ चा मुंबई ५. १९६६ चा महाराष्ट्र ४१. २. भारतीय वन अधिनियम, १९२७ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्याच्या कलम २, खंड (४-ग) यात, "मुंबई जमीन महसूल" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "असा समजावा ;" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६, यात व्याख्या केल्याप्रमाणेचा महसूल अधिकारी, असा समजावा" ; हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २६ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम २६, पोट-कलम (१) मध्ये, "सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी "एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा दोन हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २८ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम २८ मध्ये,—

(अ) "मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९३३" या मजकुराऐवजी "मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९३३ चा मुंबई ६ १९५९ चा मुंबई ३.

(ब) "मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५" या मजकुराऐवजी "महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९२५ चा मुंबई ७ १९६१ चा महाराष्ट्र २४.

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ३३ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ३३, पोट-कलम (१) मध्ये,—

"सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी "एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा दोन हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ४२ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ४२, पोट-कलम (१) मध्ये,—

"सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी "एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा दोन हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ५२ ची सुधारणा.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ५२ यात,—

(अ) पोट-कलम (१) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१-क) वनोत्पादनाची वाहतूक करण्याकरिता म्हणून ज्या वाहनाच्या बाबतीत एखादा वनविषयक गुन्हा करण्यात आला आहे किंवा करण्यात येत आहे असे मानण्यास कारण असेल असे एखादे वाहन वापरण्यात आले आहे किंवा वापरण्यात येत आहे असे, कोणत्याही वन अधिकाऱ्यास किंवा पोलीस अधिकाऱ्यास सकारण वाटेल तर त्यास, वाहनचालकास किंवा असे वाहन जिच्या ताब्यात असेल अशा अन्य व्यक्तीला, ते वाहन थांबवण्यास आणि वाहनातील वस्तूंची तपासणी करण्यासाठी आणि अशा वाहन चालकाच्या किंवा वाहन ज्याच्या ताब्यात असेल अशा अन्य व्यक्तीच्या ताब्यात असलेल्या, व वाहन नेण्यात येणाऱ्या मालाच्या संबंधातील सर्व कागदपत्रांचे निरीक्षण करण्यासाठी सयुक्तिकपणे आवश्यक असेल त्या वेळेपर्यंत, ते वाहन, थांबवून ठेवण्यास भाग पाडता येईल";

(ब) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) "त्या मालमत्तेवर" या मजकुरानंतर "किंवा ते ज्यामध्ये ठेवण्यात आलेले असेल असे पात्र किंवा वाहन (कोणतेही असल्यास) यावर" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) परंतुकानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"आणखी असे की, ज्याच्यामुळे अभिग्रहण करण्यात आलेले असेल असा गुन्हा, इमारती लाकूड, चंदनाचे लाकूड, जळाऊ लाकूड, कोळसा किंवा राज्य शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित करण्यात येईल असे अन्य वनोत्पादन (यात यापुढे ज्याचा निर्देश "अधिसूचित वनोत्पादन" असा करण्यात आला आहे) यांच्या संबंधातील असेल आणि ते वनोत्पादन राज्य शासनाची मालमत्ता असेल त्याबाबतीत, असा अधिकारी कलम ६१-क अन्वये संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यालाही देखील अशा अभिग्रहणाबाबत कळवील.

**स्पष्टीकरण.**—या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी "शासनाची मालमत्ता" किंवा "राज्य शासनाची मालमत्ता" या शब्दप्रयोगात महाराष्ट्र वन विकास महामंडळ, मर्यादित यांच्या मालकीच्या मालमत्तेचा समावेश होतो.";

(क) समास टीपेमध्ये, "सरकारजमा" या शब्दानंतर "आणि समपहरण" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ५३ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ५३ मध्ये "लिहून दिल्यानंतर ती मालमत्ता" या मजकुरानंतर "कलम ६१छ यांस अधीन राहून" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ५४ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम ५४ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

दंडाधिकाऱ्याला अभिग्रहणाचे वृत्त मिळाल्यानंतरची कार्यवाही.

"५४. कलम ५२, पोट-कलम (२) अन्वये असे कोणतेही वृत्त मिळाल्यानंतर, दंडाधिकाऱ्यास, सोईस्कर असेल त्याप्रमाणे शक्य तितक्या त्वरेने, गुन्हेगाराला अटक करण्यासाठी व त्याची संपरीक्षा करण्यासाठी आणि, कलमे ५८ आणि ६१छ यांस अधीन राहून, कायद्यानुसार मालमत्तेची विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक असेल अशी उपाययोजना करता येईल.".

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ५५ ची सुधारणा.

१०. मुख्य अधिनियमाच्या कलम ५५ मध्ये,—

(अ) पोट-कलम (१) यात, "सरकारजमा होण्यास पात्र होतील". या मजकुराऐवजी "कलम ६१छ यास अधीन राहून, सिद्धापराध ठरवणाऱ्या न्यायालयाच्या आदेशाद्वारे समपहृत होण्यास पात्र होतील" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (२) अन्वये "सरकारजमा" या शब्दाऐवजी "समपहृत" हा शब्द दाखल करण्यात येईल.

(क) समास टीपेमध्ये, "सरकारजमा करण्यास" या मजकुराऐवजी "समपहृत केली जाण्यास" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ५६ ची सुधारणा.

११. मुख्य अधिनियमाच्या कलम ५६ मध्ये,—

(अ) "सरकारजमा करण्यात आलेले" या मजकुराऐवजी "समपहृत करण्यात आलेले" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ब) "अन्य कोणत्याही बाबतीत, न्यायालय निर्देश देईल त्या पद्धतीने त्याची विल्हेवाट लावण्यात येईल." या मजकुराऐवजी "अन्य कोणत्याही बाबतीत, कलम ६१-छ ला अधीन राहुन न्यायालय निर्देश देईल त्या पद्धतीने त्याची विल्हेवाट लावण्यात येईल." हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ५७ ची सुधारणा.

१२. मुख्य अधिनियमाच्या कलम ५७ मध्ये, "गुन्हा करण्यात आलेला आहे असे दंडाधिकाऱ्यास आढळून आल्यास" या मजकुराने सुरू होणाऱ्या व "सरकारजमा करण्याचा" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"गुन्हा करण्यात आलेला आहे असे दंडाधिकाऱ्यास आढळून आल्यास, परंतु कलम ६१छ यास अधीन राहून तो, गुन्हा ज्या मालमत्तेच्या संबंधात करण्यात आलेला आहे ती मालमत्ता, गुन्हा करताना वापरण्यात आलेली हत्यारे, नावा, वाहन किंवा गुरेढोरे आणि अन्य वस्तू यांसह समपहृत करण्याचा".

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ५८ ऐवजी नवीन कलम दाखल करणे

१३. मुख्य अधिनियमाच्या कलम ५८ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

कलम ५२ अन्वये अभिग्रहण केलेल्या नाशवंत मालमत्तेच्या संबंधातील प्रक्रिया.

"५८. ज्याने कलम ५२ अन्वये अभिग्रहण केले असेल असा वन अधिकारी, या अधिनियमात किंवा इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ५२ अन्वये अभिग्रहण केलेल्या आणि निसर्गतःच लवकर खराब होणाऱ्या कोणत्याही मालमत्तेची विक्री करू शकेल आणि ती मालमत्ता विकण्यात आली नसती तर त्याने ज्या पद्धतीने तिची विल्हेवाट लावली असती त्याचपद्धतीने विक्रीच्या उत्पन्नाची विल्हेवाट लावू शकेल आणि अशा प्रत्येक विक्रीबाबत त्याच्या कार्यालयीन वरिष्ठाला कळवील.".

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ६० ची सुधारणा.

१४. मुख्य अधिनियमाच्या कलम ६० मध्ये, "सरकारजमा करण्यासंबंधीचा" या मजकुराऐवजी "समपहृत करण्यासंबंधीचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.".

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ६१ ची सुधारणा.

१५. मुख्य अधिनियमाच्या कलम ६१ मध्ये, "कलम ५२ अन्वये अभिग्रहण केलेली कोणतीही मालमत्ता तात्काळ मुक्त करण्याविषयी" या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"कलम ५२ अन्वये अभिग्रहण केलेली व जी राज्य शासनाची मालमत्ता नाही अशी कोणतीही मालमत्ता तात्काळ मुक्त करण्याविषयी आणि अशा मालमत्तेच्या संबंधातील कोणताही दोषारोप काढून घेण्याविषयी".

१६. मुख्य अधिनियमाच्या कलम ६१ नंतर पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ यात कलमे ६१-क ते ६१-छ समाविष्ट करणे.

"६१-क. (१) या प्रकरणाच्या पूर्वगामी उपबंधांमध्ये किंवा अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, राज्य शासनाची मालमत्ता असेल, अशा इमारती लाकूड, चंदनी लाकूड, जळाऊ लाकूड, कोळसा किंवा अन्य कोणतेही अधिसूचित वन उत्पादन यासारख्या गोष्टीं-बाबत वनविषयक गुन्हा घडल्याने वाटत असेल त्या बाबतीत, कलम ५२ च्या पोट-कलम (१) अन्वये मालमत्ता ताब्यात घेणारा अधिकारी, अवाजवी विलंब न लागता ती मालमत्ता, असा गुन्हा करताना वापरण्यात आलेली हत्यारे, नावा, वाहने व जरेढोरे यांसह, राज्य शासनाने, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या संदर्भात प्राधिकृत केला असेल असा सहाय्यक वन संरक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जा नसणाऱ्या अधिकाऱ्यासमोर (यात यापुढे ज्याचा "प्राधिकृत अधिकारी" असा निर्देश करण्यात आला आहे) सादर करील.

वनविषयक गुन्हा घडला असल्याचे वाटत असेल त्याबाबतीत वन अधिकाऱ्यांनी वन उत्पादन सरकारजमा करणे.

(२) राज्य शासनास, पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही स्थानिक क्षेत्रासाठी एक किंवा अधिक अधिकाऱ्यांना प्राधिकृत करता येईल.

(३) जेव्हा प्राधिकृत अधिकारी, कलम ५२ च्या पोट-कलम (१) अन्वये, राज्य शासनाची मालमत्ता असलेले कोणतेही इमारती लाकूड, चंदनी लाकूड, जळावू लाकूड, कोळसा किंवा अन्य कोणतेही अधिसूचित वन उत्पादन सक्तीने ताब्यात घेईल किंवा अशी मालमत्ता पोट-कलम (१) अन्वये प्राधिकृत अधिकाऱ्यांसमोर सादर करील आणि अशा मालमत्तेच्या संबंधात वनविषयक गुन्हा घडला असल्याबद्दल त्या अधिकाऱ्यांची खात्री पटेल त्या बाबतीत, अशा प्राधिकृत अधिकाऱ्यास, अशा रीतीने सक्तीने ताब्यात घेतलेली मालमत्ता, तो गुन्हा करताना वापरलेली सर्व हत्यारे, नावा, वाहने व गुरेढोरे यांसह, सरकारजमा करण्याचा आदेश देता येईल. मग असा वनविषयक गुन्हा घडल्याबद्दल खटला दाखल केलेला असो वा नसो.

(४) (क) पोट-कलम (३) अन्वये, मालमत्ता सरकारजमा करण्याचा आदेश दिल्यानंतर प्राधिकृत अधिकाऱ्याचे ज्या बाबतीत असे मत होईल की, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे, त्या बाबतीत त्यास, सरकारजमा करण्यात आलेली मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग आणि हत्यारे नावा, वाहने व गुरेढोरे यांची जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचा आदेश देता येईल.

(ख) कोणतीही सरकारजमा मालमत्ता किंवा हत्यारे, नावा, वाहने व गुरेढोरे यांची वर सांगितल्याप्रमाणे विक्री करण्यात येईल त्या बाबतीत, त्याच्या उत्पन्नातून अशा कोणत्याही लिलावाचा खर्च व इतर आनुषंगिक खर्च वजा करून ते उत्पन्न, या कलमाखाली देण्यात आलेली मालमत्ता सरकारजमा करण्याचा आदेश कलम ६१-ग किंवा ६१-घ खालील आदेशाद्वारे रद्द करण्यात किंवा निर्भावित करण्यात येईल त्याबाबतीत त्या मालमत्तेच्या मालकाला किंवा अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, ज्या व्यक्तीकडून ती मालमत्ता ताब्यात घेण्यात आली असेल त्या व्यक्तीला देण्यात येईल.

६१-क कलमाखाली मालमत्ता सरकारजमा कर यापूर्वी कारण दाखवा नोटीस देणे.

६१-ख. (१) कोणतेही इमारती लाकूड, चंदनी लाकूड, जळाऊ लाकूड, कोळसा किंवा अन्य कोणतेही अधिसूचित वन उत्पादन, हत्यारे नावा, वाहने किंवा गुरेढोरे सरकारजमा करण्याचा ६१-क खाली कोणताही आदेश, ज्या व्यक्तीकडून ती मालमत्ता सक्तीने ताब्यात घेण्यात आली असेल त्या व्यक्तीला लेखी नोटीस दिल्याशिवाय आणि तिने कोणतेही आक्षेप घेतल्यास ते विचार घेतल्याशिवाय, केला जाणार नाही.

परंतु, मोटार वाहनाच्या नोंदणीकृत मालकाला लेखी नोटीस देणे व्यवहार्य आहे असे प्राधिकृत अधिकाऱ्यांचे मत असल्यास तशी नोटीस त्यास दिल्याशिवाय आणि त्यांचे आक्षेप, कोणतेही असल्यास ते, विचारात घेतल्याशिवाय एखादे, मोटारवहान सरकारजमा करण्याचा आदेश करण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या उपबंधास बाध न आणता हत्यारे, नावा, वाहने किंवा गुरा-ढोरांचा मालक प्राधिकृत अधिकाऱ्यांची खात्री होईल अशारीतीने जर असे सिद्ध करील की, मालकाच्या स्वतःच्या किंवा त्याच्या एजंटांच्या, असल्यास, माहितीशिवाय किंवा मूकसंमती-शिवाय, हत्यारे इत्यादींचा वापर इमारती लाकूड, चंदनी लाकूड, जळाऊ लाकूड, कोळसा किंवा अन्य कोणतेही अधिसूचित वनउत्पादन यांची वाहतूक करण्यासाठी करण्यात आला होता आणि हत्यारे, नावा, वाहने किंवा गुरेढोरे यांचा ताबा असणाऱ्या व्यक्तींपैकी प्रत्येकीने त्यांचा तसा वापर होऊ नये म्हणून शक्य व आवश्यक तेवढी सर्व खबरदारी घतली होती, तर कलम ६१-क खाली कोणतेही हत्यार, नाव, वाहन किंवा गुरेढोरे सरकारजमा करण्याचा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

पुनरीक्षण.

६१-ग. वन संरक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसणाऱ्या, राज्य शासनाने, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या बाबतीत विशेषकरून, अधिकार सोपविलेल्या कोणत्याही वन अधिकाऱ्यास, कलम ६१-क खाली प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा अभिलेख स्वतः होऊन बोलावून घेऊन तपासता येईल; आणि त्याला योग्य वाटेल अशी चौकशी करता किंवा करविता येईल आणि असे आदेश काढता येतील :

परंतु, अशा आदेशाच्या तारखेपासून ३० दिवस संपल्यानंतर, असा कोणताही अभिलेख मागवण्यात येणार नाही आणि दरम्यानच्या काळात प्राधिकृत अधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध कलम ६१-घ अन्वये अपील दाखल करण्यात आले तर या कलमाखाली कोणताही आदेश काढण्यात येणार नाही;

आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय, तिला बाधक असा कोणताही आदेश या कलमान्वये काढण्यात येणार नाही.

अपील.

६१-घ. (१) कलम ६१-क किंवा कलम ६१-ग अन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, असा आदेश तिला कळविल्याच्या तारखेपासून तीस दिवसांत, ज्या क्षेत्रात आदेशाची संबंधित अशी मालमत्ता, हत्यारे, नावा, वाहने व गुरेढोरे जप्त करण्यात आली असतील त्या क्षेत्रावर अधिकारिता असणाऱ्या सत्र न्यायाधीशाकडे अपील करता येईल आणि सत्र न्यायाधीश, अपीलकाराला आणि प्राधिकृत अधिकाऱ्याला किंवा, यथास्थिति कलम ६१-ग खाली विशेषरीत्या अधिकार सोपवलेल्या अधिकाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, ज्याविरुद्ध अपील केले असेल तो आदेश कायम करणारा, त्यात फेरबदल करणारा किंवा तो रद्दबातल करणारा आदेश काढील.

(२) पोट-कलम (१) खालील सत्र न्यायाधीशाचा आदेश अंतिम असेल व त्यावर कोणत्याही न्यायालयामध्ये आक्षेप घेता येणार नाही.

सरकारजमा करण्याच्या निवाड्यामुळे इतर शिक्षांवर परिणाम न होणे.

६१-ङ. कलम ६१-क किंवा कलम ६१-ग किंवा कलम ६१-घ अन्वये दिलेल्या, सरकारजमा करण्याबद्दलच्या कोणत्याही निवाड्याचा परिणाम होणारी व्यक्ती, या अधिनियमाखाली किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याखाली ज्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरेल ती शिक्षा लादण्यास निवाड्यामुळे प्रतिबंध होणार नाही.

सरकारजमा केलेली मालमत्ता इ. शासनाकडे केव्हा निहित होईल ते.

६१-च. कोणतीही मालमत्ता किंवा कोणतीही हत्यारे, नावा, वाहने किंवा गुरेढोरे सरकारजमा करण्यासंबंधी कलम ६१-क किंवा कलम ६१-ग किंवा कलम ६१-घ अन्वये आदेश काढण्यात आला असेल आणि असा आदेश, अशी मालमत्ता किंवा हत्यार, नाव, वाहन किंवा गुरेढोरे यांच्या बाबतीत पूर्णतः किंवा अंशतः अंतिम झालेला असेल तेव्हा, अशी संपूर्ण मालमत्ता किंवा तिचा भाग, हत्यार, नाव, वाहन किंवा गुरेढोरे अथवा कलम ६१-क, पोट-कलम (४), खंड (क) अन्वये ते विकण्यात आले असेल तर त्याच्या विक्रीचे उत्पन्न सर्व भारांपासून मुक्त, राज्य शासनाकडे निहित होईल.

६१-छ. राज्य शासनाची मालमत्ता असणारे कोणतेही इमारती लाकूड, चंदनी लाकूड, जळाऊ लाकूड, कोळसा किंवा इतर कोणतेही अधिसूचित वनोत्पादन आणि कोणताही गुन्हा करताना वापरण्यात येणारे कोणतेही हत्यार, नाव, वाहन किंवा गुरेढोरे कलम ५२, पोट-कलम (१) अन्वये, सक्तीने ताब्यात घेण्यात येईल तेव्हा कलम ६१-क खालील प्राधिकृत अधिकारी किंवा कलम ६१-ग खाली विशेषरीत्या अधिकार प्रदान केलेला अधिकारी किंवा कलम ६१-घ खाली अपिलाची सुनावणी करणारा सत्र न्यायाधीश यांना अशी मालमत्ता व कोणतेही हत्यार, होडी, वाहन किंवा गुरू यांची अभिरक्षा, ताबा, सुपूर्दगी, विल्हेवाट किंवा वाटप यासंबंधी आदेश काढण्याची अधिकारिता असेल आणि या अधिनियमात किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये किंवा त्यावेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, इतर कोणताही अधिकारी, न्यायालय, न्यायाधिकरण किंवा प्राधिकारी यांना अशी अधिकारिता असणार नाही.". विवक्षित प्रकरणी अधिकारितेस रोध. १९७४ चा २.

१७. मुख्य अधिनियमाच्या कलम ६२ ला, त्या कलमाचे पोट-कलम (१) असा क्रमांक नव्याने देण्यात येईल, आणि— सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ६२ ची सुधारणा.

(अ) अशा रीतीने नव्याने क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१) मध्ये "सरकारजमा" या मजकुराऐवजी "सरकारजमा किंवा समपहृत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) अशा रीतीने नव्याने क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१) नंतर पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(२) अशा रीतीने लादण्यात आलेला कोणताही दंड किंवा त्याचा कोणताही भाग, जर सिद्धापराध ठरविणाऱ्या न्यायालयाने तसा निदेश दिला तर, अशा सक्तीने ताब्यात घेण्यामुळे व्यथित झालेल्या व्यक्तीस, भरपाई म्हणून देण्यात येईल.".

१८. मुख्य अधिनियमाच्या कलम ६५ मध्ये,— सन १९२७ चा अधिनियम १६ याच्या कलम ६५ ची सुधारणा.

"अशा व्यक्तीला मुक्त करू शकेल." या मजकुराऐवजी, "कलम ६५-क यास अधीन राहून व त्यास बाध न येऊ देता, अशा व्यक्तीला मुक्त करू शकेल." हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१९. मुख्य अधिनियमाच्या कलम ६५ नंतर पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :— सन १९२७ चा अधिनियम १६ यात कलम ६५-क समाविष्ट करणे.

"६५-क. या अधिनियमामध्ये किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी— विवक्षित गुन्हे जामीनयोग्य नसणे. १९७४ चा २.

(क) खंड (ख) मध्ये उल्लेख केलेल्या कलमांखालील किंवा कलमांच्या खंडांखालील गुन्हे जामीन योग्य नसतील.

(ख) खंड (क) मध्ये उल्लेख केलेली कलमे आणि कलमांचे खंड पुढीलप्रमाणे आहेत :—

कलम २६, पोट-कलम (१) चे खंड (क),(ख),(च),(छ),(ज) आणि (झ).

कलम ३३, पोट-कलम (१) चे खंड (क),(ख),(ग),(घ),(च) आणि (छ).

कलम ४२.

कलम ६३.

(ग) खंड (ख) मध्ये निर्देश केलेल्या कोणत्याही गुन्ह्याबद्दल कोणतीही आरोपित व्यक्ती अभिरक्षत असल्यास,—

(एक) खटला दाखल करणाऱ्या पक्षास, अशा मुक्ततेच्या अर्जाला विरोध करण्याची संधी दिल्याशिवाय, आणि

(दोन) खटला दाखल करणारा पक्ष अर्जास विरोध करील त्या बाबतीत, तो अशा गुन्ह्याबद्दल दोषी नाही असे मानण्यास वाजवी कारण आहे याबद्दल न्यायालयाची खात्री झालेली असल्याशिवाय तिला जामिनावर किंवा स्वतःच्या जामीनपत्रावर मुक्त करण्यात येणार नाही.".

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ६७ ची सुधारणा.

२०. मुख्य अधिनियमाच्या कलम ६७ मध्ये—

(क) "फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५)" या मजकुराऐवजी "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २)" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८९८ चा ५. १९७४ चा २.

(ख) "जास्तीत जास्त सहा महिने इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा जास्तीत जास्त पाचशे रुपये इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र अशा कोणत्याही वनविषयक गुन्ह्याबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५) या अन्वये संक्षिप्तरीत्या संपरीक्षा करु शकेल" या मजकुराऐवजी "जास्तीत जास्त एक वर्ष इतक्या द्रव्यदंडास किंवा शिक्षांस पात्र ठरेल आणि उक्त संहितेची कलमे २६२ ते २६५ (दोन्ही धरून) यांचे उपबंध अशा संपरीक्षेच्या बाबतीत लागू होईल.) परंतु, उक्त संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असेल तरीही या कलमाअन्वये एखाद्या गुन्ह्याचा अपराधसिद्धीच्या संक्षिप्त संपरीक्षेच्या खटल्यामध्ये या अधिनियमाअन्वये दंडाधिकारी कायदेशीरपणे अशा गुन्ह्याबद्दल कारावासाचा शिक्षादेश देऊ शकेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ७२ ची सुधारणा.

२१. मुख्य अधिनियमाच्या कलम ७२, पोट-कलम (१), खंड (ग) मध्ये "फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५)" या मजकुराऐवजी "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २)" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८९८ चा ५. १९७४ चा २.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.